## प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, काटोल

नि.दि.दा.क्र. ६/२०१५
चंद्रहास –वि.– शालीकराम
निशाणी ४८ खाली

## वादी तर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी

**माझे नाव** जगदीश कृष्णराव महल्ले
**वय सुमारे** ४६ **वर्षे, व्यवसाय :** नोकरी,
**निवासस्थान :** लाखांदुर, तह. लाखांदुर, जिल्हा भंडारा.

## सरतपासणी वादी तर्फे ॲड एस.व्ही. देशमुख यांचे मार्फत.

सन २०१५ ते सन २०१७ दरम्यान मी उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, काटोल येथे निमताणदार (पर्यविक्षक) या पदावर कार्यरत होतो. माझ्या अख्त्यारीत न्यायालयीन आदेशाप्रमाणे मोजणी करण्याचे काम होते. माझ्या कडे या प्रकरणातील मौजा सोनमोह येथील सर्व्हे क्र.१४५ व १४६ ची मोजणी करण्याबाबत रिट (आदेश) प्राप्त झाले होते. दिनांक ०९/१२/२०१५ रोजी मी प्रत्यक्ष मोक्यावर जावुन सदर सर्व्हे क्रमांकाची मोजणी केली. मी मोजणीनंतर मोजणीची क प्रत अहवालासह कार्यालयात दाखल केली व कार्यालयाने ती सदर प्रकरणामध्ये दाखल केली. आता मला मोजणी अहवाल दाखल करण्याकरीता आमच्या कार्यालयातुन न्यायालयात दाखल केलेले पत्र निशानी २० दाखविण्यात आले. तसेच मला मोजणी दिनांक ०९/१२/२०१५ रोजीची क प्रत दाखविण्यात आली. त्यावर शिरस्तेदार व छाननी लिपीक, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, काटोल यांच्या सहया आहेत. त्या मी ओळखतो. सदर प्रतीवर मोजणी करणार (निमताणदार) म्हणुन माझी सुध्दा सही आहे. तसेच त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का सुध्दा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी ४९** देण्यात येते. सदर क प्रतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे मी सोनमोह येथील शेत सर्व्हे क्र.१४५ व १४६ ची मोजणी केली. नकाशावर दर्शविलेला दुर्बीण दगड व विहीर याचा आधार घेवुन मी मोजणी केली होती. मोजणीमध्ये मला शेत सर्व्हे क्र.१४६ च्या मालकाने शेत सर्व्हे क्र. १४५ वर ०.१७ हे.आर. एवढया शेत जमीनीवर अतिक्रमण केल्याचे आढळले. ते अतिक्रमण नकाशा क प्रत निशानी ४९ मध्ये निळया शाईने दर्शविले आहे व त्यास अ अक्षराने संबोधले आहे. त्याप्रमाणे मी माझा मोजणी अहवाल दाखल केला. मोजणीचा मुळ अभिलेख मी सोबत आणला आहे. मुळ अभिलेखानुसार प्रकरणात दाखल करण्यात आलेली

DISTRICT COURT NAGPUR

क प्रत निशानी ४९ बरोबर आहे.

**उलटतपास प्रतीवादी तर्फे ॲड. यु.आर.खंते यांचे मार्फत.**

अभिलेखावरील आमच्या कार्यालयाने मोजणी अहवालासोबत दिलेले पत्र निशानी २० मधील मजकुर की, दिनांक ०९/१२/२०१५ रोजी वादी यांनी दाखविलेल्या वहीवाटीप्रमाणे इकडील कार्यालयातील जगदीश कृ. महल्ले, निमताणदार - १ यांनी मोजणी केली, तो मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी ने दाखविलेल्या वहीवाटीप्रमाणे मी मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.१४५ व १४६ ची मोजणी मी त्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ उताऱ्यावरील नमुद क्षेत्रफळानुसार केली. यदाकदाचीत सर्व्हे क्र.१४५ चे क्षेत्रफळ ०.६२ हे.आर. असते तर निशानी ४९ मध्ये दर्शविलेले अतिक्रमण निघाले नसते. हे म्हणणे खरे आहे की, वहीवाटीप्रमाणे दोन्ही शेता दरम्यान एक निश्चित धुरा होता. मोजणी नकाशा निशानी ४९ नुसार सर्व्हे क्र.१४५ व १४६ दरम्यान असलेल्या धुऱ्याच्या पुढे प्रतीवादीचे वादीच्या शेतावर अतिक्रमण आढळुन आले.

हे म्हणणे खरे आहे की, नकाशा निशानी ४९ मध्ये दाखविण्यात आलेले दुर्बीण दगड व विहीर ह्या कोण्या शेत सर्व्हे क्रमांकामध्ये आहे हे दर्शविले नाही तसेच ते दुर्बीण दगड व विहीर सर्व्हे क्र.१४५ व १४६ पासुन किती अंतरावर आहे हे सुद्धा दर्शविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तश्या प्रकारे कोणतेही दुर्बीण दगड अथवा विहीर त्या ठिकाणी नसल्यामुळे मी त्या संबंधी उल्लेख निशानी ४९ मध्ये केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलाही दुर्बीण दगडपासुन (ट्रॅव्हर्स पॉइंट) मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी यांच्या सांगण्यानुसार चुकीची मोजणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नकाशा निशानी ४९ मध्ये प्रतिवादीच्या शेत जमीनीवर अतिक्रमण असल्याबाबतचे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाच्या आदेशानुसार मोजणी करण्याची जबाबदारी मला कार्यालयाने दिल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणी पुर्वी प्रतीवादीला नोटीस दिली नाही व त्याच्या गैरहजरी मध्ये मोजणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यानुसार चुकीची मोजणी करून त्या आधारे खोटा मोजणी अहवाल निशानी ४९ न्यायालयात दाखल केला आहे.

वादीच्या वकीलानी साक्षदाराची फेरतपासणी करण्याची परवानगी मागीतली.

DISTRICT COURT NAGPUR

परवानगी देण्यात येते.

**फेरतपास वादी तर्फे अॅड. संजय देशमुख यांचे मार्फत.**

प्रश्न : मोजणी नकाशा निशानी ४९ मध्ये सुची क्रमांक १ समोर नमुद खातेदार व लागु खातेदार या शब्दाचा अर्थ काय ?

सदर प्रश्नावर प्रतीवादीच्या वकीलानी असा आक्षेप नोंदविला की, साक्षीदाराच्या उलटतपासणी मध्ये संदीग्धता नसल्यामुळे व सदर प्रश्न कोणतीही अस्पष्टता दुर करण्याच्या दृष्टीने आवश्यक नसल्यामुळे विचारता येणार नाही असे कथन केले. वादीच्या वकीलानी असे कथन केले की, उलटतपासा दरम्यान साक्षदारास त्यांनी अर्जदाराने सांगीतलेल्या वहीवाटीनुसार मोजणी केल्याबाबत प्रश्न विचारला असल्यामुळे निर्माण झालेली संदिग्धता दुर करण्याच्या दृष्टीने सदर प्रश्न आवश्यक आहे.

दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला. आक्षेपाच्या अंतीम निकालाला आधीन राहुन प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात येते.

उत्तर : मोजणी नकाशा निशानी ४९ मध्ये सुची मधील क्र.१ समोर नमुद खातेदार या शब्दाचा अर्थ मोजणी करण्यात आलेल्या सर्व्हे क्र.१४५ व १४६ चे मालक व लागु खातेदार म्हणजे या सर्व्हे क्रमांकाच्या आजुबाजुच्या शेताचे मालक असा होय.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

**(अनुप आर. अभ्यंकर)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, काटोल. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, काटोल.

**दिनांक : १९/१०/२०१८**

DISTRICT COURT NAGPUR

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of evidence are word to word, as per original evidence.

C.D.Gahukar
Stenographer (Lr.Gr.)

DISTRICT COURT
NAGPUR